Jai Kisan Boys Hostel Building



Correspondence with Government Official Regarding Admission Appeal

स्थापना - १२ जुलै १९६७ कार्यालय फोन - २२००३९ / २२०१३०

# जनता शिक्षण संस्था, वाई. (जि. सातारा)

**अनिल जोशी** (सचिव) निवास फोन : (०२१६७) २२०५७० मोबा. ९७६६९९५९०४

**लक्ष्मणराव पाटील** (उपाध्यक्ष/विश्वस्त) निवास फोन : (०२१६२) २४४२४५ मोबा. ९८२२३९०८९८

**प्रतापराव भोसले** (अध्यक्ष/विश्वस्त) निवास फोन : (०२१६७) २८५२२५ मोबा. ९४२२६००४२५

Registered under the Societies Registration Act, 1860. R. No. BOM / 85 / SATARA &
Under the Public Trust Act, 1950. R. No. F / 70 / SATARA

जावक क्रमांक : जाशिसं/विव/२५ दिनांक : २६/०५/२०१

प्रति,
मा. विभागीय आयुक्त (महसूल)
नाशिक

विषय:— आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या मोफत शिक्षणाबाबत.
संदर्भ:— मा. उपसचिव, महसुल व वन विभाग यांचे पत्र क्र. एससीवाय—२०१६/प्र.क्र. २१५/म—७, दिनांक ११ एप्रिल २०१६

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भीय पत्रान्वये, महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई, नापिकी व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे शेतकरी कुटुंबे उध्वस्त होवू नयेत, तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुढे चालू रहावे म्हणून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील, सर्व जातीधर्माच्या एकूण २५० अशा निराधार व गरीब विद्यार्थ्यांना (फक्त मुले) वाईतील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये विनाशुल्क शिक्षण देण्याचा व या विद्यार्थ्यांसाठी चहापान, नाष्टा, भोजन, पुस्तके, गणवेश, वैद्यकीय तपासणी, अंथरुण—पांघरुण, स्नानगृह इ. सुविधांची सुसज्ज वसतीगृहामध्ये मोफत व्यवस्था करण्याचा निर्णय जनता शिक्षण संस्थेने घेतलेला आहे. संस्थेचा सदर निर्णय संस्थेचे अध्यक्ष व विश्वस्त मा. प्रतापराव भोसले यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांना दिनांक ०४ एप्रिल २०१६ रोजी सादर केलेल्या पत्राद्वारे कळविलेला आहे. तसेच सदर पत्राद्वारे अशा विद्यार्थ्यांची माहिती त्यांच्या आमच्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी शासनाकडून मिळावी अशी त्यांना विनंती केली आहे. महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भ पत्रान्वये महाराष्ट्रातील सर्व आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना अशा स्वरुपाची माहिती आमच्या संस्थेस पाठविण्याचे आदेश दिले होते, परंतु मागील वर्षी महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची माहिती वेळेत न मिळाल्यामुळे अशा गरजू विद्यार्थ्यांचे आमच्या महाविद्यालयात पुरेसे प्रवेश झाले नाहीत.

आमच्या मोफत वसतिगृह बांधकामासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व माजी विद्यार्थी संघ यांनी पुढाकार घेतला आहे. या वसतिगृहाचे सुमारे १४००० ते १५००० स्क्वे. फुटाचे बांधकाम पुर्ण झालेले असून त्यामध्ये वसतिगृह खोल्या, स्नानगृह, शौचालय, स्वयंपाकगृह, भोजनगृह, अभ्यासिका, वसतिगृह अधिक्षकांची खोली इत्यादी सुविधा करण्यात आलेल्या आहेत.

**कृपया आपल्या विभागातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची माहिती आमच्या संस्थेस लवकरात लवकर पाठविण्याची व्यवस्था करावी.** सदर माहिती सत्रारंभापूर्वी मिळाल्यास आम्हाला आत्महत्याग्रस्त कुटुंबियांशी ताबडतोब संपर्क साधता येईल व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७—१८ मध्ये विनाशुल्क प्रवेश देवून त्यांची मोफत निवास व्यवस्था करणे सोईचे होईल.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(signature)

प्रा. एन. व्ही. चौधरी
सहसचिव
जनता शिक्षण संस्था, वाई

Discussion with MP of Akola Constituency regarding the students' Admission from the Suicidal Affected Farmers' Families



Visit to the Suicidal Affected Farmers' Families - Ruikar Miamba (Buldhana)



‘

Press Conference at Suicidal Affected Area-Vidharbh

